आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार, दिनांक ०९ एप्रिल २०२४

ठळक बातम्या

1. रामटेक तसेच नागपूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्या रामटेक तालुक्यातील कन्हान येथे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा.

2. लोकसभा निवडणूकीच्या दूसऱ्या टप्प्यासाठी राज्यातील ८ जागांसाठी २०४ उमेदवार मैदानात.

3. लोकसभेच्या ४८ मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित; शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागा लढवणार.

4. मराठी नूतनवर्ष अर्थात गुडीपाडव्याचा सण सर्वत्र उत्साहात साजरा.

5. नागपूर-सह विदर्भाच्या काही जिल्ह्यात आज आणि उद्या वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट.

*****

जाहिर सभा

रामटेक लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते राजू पारवे तसेच नागपूर लोकसभा मतदारसंघातील भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रचारार्थ उद्या रामटेक तालुक्यातील कन्हान येथील बुक ब्रँड मैदानावर संध्याकाळी पाच वाजता भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे ,याप्रसंगी भाजपचे राज्यातील वरिष्ठ नेते केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले आणि नागपूर जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी आणि नेते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. रामटेक लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसचे श्याम बर्वे हे उमेदवार असून त्यांना वंचित बहुजन आघाडीने जाहीर पाठिंबा जाहीर केला आहे. त्याचप्रमाणे बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेने देखील रामटेक मध्ये श्याम बर्वे यांना पाठिंबा जाहीर केला आहे तर नागपूर मध्ये नितीन गडकरी यांच्या विरोधात काँग्रेसचे विद्यमान शहराध्यक्ष आणि पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांना उमेदवारी मिळाली असून त्यांनी आपला प्रचार संपूर्ण नागपूर भर चालवला आहे. त्यांना सुद्धा वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती या 11 एप्रिल ला उत्तर नागपूर आतील इंदोरा येथे एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. बहुजन समाज पक्षातर्फे नागपूरतून योगेश लांजेवार तर रामटेक मधून संदीप मेश्राम

यांना उमेदवारी मिळालेली आहे. नागपूर लोकसभा मतदारसंघात एकूण 26 उमेदवार रिंगणात असून रामटेक लोकसभा मतदारसंघात एकूण 28 उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. पूर्व विदर्भात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वाधिक उमेदवार हे रामटेक लोकसभा मतदारसंघात उभे आहेत. पूर्व विदर्भातील पाचही लोकसभा मतदारसंघात येत्या 19 एप्रिल ला मतदान होणार आहे.

लोकसभा टप्पा

लोकसभा निवडणूकीच्या दूसऱ्या टप्प्यासाठी १३ राज्यांमधल्या ८८ मतदारसंघात एकूण बाराशे दहा उमेदवार रिंगणात असल्याचं काल अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. असून एकूण ८८ मतदारसंघात २६ एप्रिल ला मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी एकूण २ हजार ६३३ अर्ज आले होते. त्यातील १ हजार ४२८ अर्ज बाद झाले. केरळमधून सर्वाधिक ५०० उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. त्रिपुरामधील एक मतदारसंघात सर्वात कमी १४ अर्ज आले असून महाराष्ट्रातल्या नांदेड मतदारसंघात सर्वाधिक ९२ अर्ज आले आहेत. या टप्प्यासाठीचं मतदान २६ एप्रिलला होणार आहे. या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ८ लोकसभा मतदारसंघांतील एकंदर ९५ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

महाविकास आघाडी

महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचं जागावाटपाचं सूत्र ठरलं असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागा लढवणार आहे. महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत आज जागावाटपाबाबत घोषणा करण्यात आली. या परिषदेला महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले आदी उपस्थित होते.काँग्रेस पक्ष नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, उत्तर मध्य मुंबई, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक, उत्तर मुंबई या जागा लढवणार आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, दक्षिण अहमदनगर आणि बीड या जागा लढवणार

आहे. तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशीम, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, दक्षिण मुंबई, ईशान्य मुंबई या जागा लढवणार आहेत.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा’

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका,स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण नांदेड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित, गट – ब सेवा मुख्य परीक्षा - २०२३ या परीक्षेतील दुय्यम निबंधक श्रेणी-१, मुद्रांक निरीक्षक संवर्गाच्या एकूण ४९ पदांचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेमध्ये नाशिक जिल्ह्यातील भूषण निवृत्ती लांडगे हे अराखीव तसंच मागास वर्गवारीतून राज्यात प्रथम आले आहेत. तर महिला अराखीव गटातून सांगली जिल्ह्यातील गितांजली रविंद्रनाथ कोळेकर राज्यात प्रथम आल्या आहेत. या परीक्षेचा अंतिम निकाल आणि प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवारांचे गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

गुढी पाडवा

हिंदू कालगणनेनुसार नवीन वर्षाला आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यापासून प्रारंभ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल चंद्रपुरात जाहीर सभेतून जनतेला मराठीतून गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच राज्यपाल रमेश बैस यांनी गुढी पाडवा तसंच मराठी वर्षानिमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. वसंतऋतुच्या आगमनासोबत दारोदारी गुढी उभारुन साजरा होणारा गुढीपाडवा आणि त्यासोबत सुरु होत असलेले मराठी नववर्ष, आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी,

चैतन्य, उत्साह, आनंद, उत्तम आरोग्य घेऊन येवो. सर्वांच्या मनातल्या आशा-आकांक्षा, उरी बाळगलेली सर्व स्वप्नं पूर्ण होवोत. यश, किर्ती, पराक्रमाची गुढी आकाशात उंच जावो," अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्यात. देशाच्या विविध भागात हा सण चैत्र शुक्लादी, युगादि, संसर पाडवो आणि चेटी चंड म्हणून साजरा केला जातो. दरम्यान, गुढीपाडव्यासाठी बाजारपेठा सजल्या आहेत. गुढी उभारण्यासाठी लागणाऱ्या बांबूच्या काठ्या आणि साखरगाठ्यांसह, पूजा साहित्याची दुकानं ग्राहकांच्या गर्दीनं फुलून गेली आहेत. गुढी पाडवा हा साडे तीन शुभ मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त मानला जातो, या मुहूर्तावर इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहनं तसंच वस्त्र आभुषणांसह गृह साहित्यानं बाजारपेठामध्ये चैतन्य दिसून येत आहे. नागपुरात आज विविध ठिकाणी गुढीपाडवा, रामाचे नवरात्र आणि चैत्राचे नवरात्र निमित्त धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरुणाई तर्फे आणि आज बाइक रॅली काढून नव वर्षाचे अभिनंदन करण्यात आलं. दरवर्षीप्रमाणे यंदाही अकोल्याच्या संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते या स्वागत यात्रेत शेकडो हिंदू समाज बांधव महिला पुरुष मोठ्या संख्येने भगवे फेटे बांधून सहभागी झाले होते. दरम्यान, रमझान ईद आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत गर्दी होत आहे.

गृह मतदान

भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघात गृह मतदान म्हणजे होम वोटिंग प्रक्रिया मतदारसंघात सुरू झाली आहे. काल आठ एप्रिल रोजी, भंडारा जिल्ह्यातून 334 ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी गृह मतदान सुविधेचा लाभ घेत मतदानाचा हक्क बजावला. तर गोंदियात 177 मतदारांनी गृहमतदान केलं. सात एप्रिल, 2024 पासून लोकसभा मतदारसंघात गृह मतदान सुरू झाले आहे. त्यानुसार सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर अधिकारी कर्मचाऱ्यांच्या टीम करून त्याद्वारे गृह मतदान प्रक्रिया आयोगाच्या निर्देशानुसार सुरळीतपणे पार पाडली आहे. सात एप्रिल रोजी भंडारा जिल्ह्यात 536 मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला होता.

## नागपूर मेट्रो

नागपूर मेट्रोने प्रवासादरम्यान विविध वस्तू विसरलेल्या तब्बल ४५० प्रवाश्यांचे साहित्य परत करीत त्यांना आनंदित आणि आश्वासित केले आहे. मेट्रो प्रवासा दरम्यान नकळत हरविल्या वस्तूंबाबत प्रवासी मेट्रो स्टेशनवरील कर्मचारी आणी अधिकार्यांना त्या संबंधी माहिती देतात. महा मेट्रो कर्मचारी या प्रकारच्या घटने करिता नेहमी सतर्क असून हरविलेले सामान संबंधित व्यक्तीकडे सुरक्षितरित्या परत केल्या जाते ज्याकारता महा मेट्रोच्या `सापडलेले आणि हरवलेली वस्तू सेल' तयार केला आहे. या माध्यमाने अश्या सर्व वस्तूंची नोंद घेतल्या जाते, त्या वस्तूचा शोध घेतला जातो आणी टी वस्तू मिळाली तर संबंधित व्यक्तीला परत केली जाते.

## हवामान

नागपूर-सह विदर्भातील भंडारा, गोंदिया, अमरावती आणि अकोला इथं आज वादळी पर्जन्यमानाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय उद्या बुलढाणा, वाशिम, अमरावती, वर्धा, नागपूर या ठिकाणी देखील वादळी पावसाच ऑरेंज अलर्ट आहे. या दोन्ही दिवशी उर्वरित जिल्ह्यात पावसाच येलो अलर्ट देण्यात आला आहे. काल रात्री नागपुरात मेघगर्जनेसह गारपिट झाली. दरम्यान हा संपूर्ण आठवडाभर हवामान ढगाळ आणि पावसाळी राहणार असल्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

*****